सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.224 ठ. क्र. 249
दि.20.12.16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



मनपा सर्व्हे नं. ४९८,५०० मधील वसंत विहार येथील ओपन स्पेस जागेवर विविध सुधारणा करणे कामाबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव तयार करणेत आलेले पूर्वगणनपत्रक क्र.१/२०१५-१६ र.रु. ५९,६०,१९२/- यांस व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे बजेट तरतूद उपलब्ध होऊन पूर्वगणनपत्रकास मा. स्थापत्य समितीची मान्यता मिळून मा. सर्वसाधारण सभेची अंतीम मंजूरी मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २०-७-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मा. मंडया नि उद्यान समिती ठराव क्र. ५, दि. २६-८-१०१६ चे शिफारसीने मा.मनपा सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेस्तव मा. स्थापत्य समिती ठराव क्र. २३३ दिनांक २३-९-१६ चे शिफारसीनुसार मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 263 ठ. क्र. 260
दि. 30/12/2016 रोजी ठेवता खालील प्रो: ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूरचे प्रवेशद्वार छत्रपती संभाजी चौक (जुना पुना नाका) येथे बाजूस असणारा नैसर्गिक ओढा असून याचे पुण्या मुंबईच्या धरतीवर सुशोभिकरण करण्यात यावे. कारण सोलापूर शहर स्मार्ट सोलापूर म्हणून घोषित झालेले आहे. या परिसरात असलेले वसंतविहार, गणेश नगर, मडकी वस्ती, अभिमानश्री, अभिषेक नगर, अवंती नगर रो हाऊस इ.च्या परिसरात या नैसर्गिक ओढयाचे रुंदीकरण, सुशोभिकरण करुन गार्डन करणेत यावे. जेणेकरुन या भागातील नागरीकांना होणारा पावसाळयातील त्रास देखील कमी होण्यास मदत होणार आहे. व तसेच स्मार्ट सिटीच्या कामामध्ये सुशोभिकरणामुळे भरच पडणार आहे. त्यामुळे सोलापूरचे प्रवेशद्वार असलेल्या छत्रपती संभाजी चौक व परिसरात नैसर्गिक ओढयाचे सुशोभकरण करणे इ.कामाचे प्लॅन इस्टीमेट तयार करुन सदरचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेत यावा. कारण शासनाकडे अशा प्रकारच्या कामकरीता विविध योजना असतात त्याच्या अंतर्गत हे काम होणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकच्या तहकूब/मासली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज २६४ ठ. क्र. २६१
दि. २०/१२/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



छत्रपती संभाजी चौक ते शिवाजी चौकापर्यंत असलेल्या मार्गास **राजमाता जिजाऊ मार्ग** असे नामकरण करणेस, ज्येष्ठ आंबेडकर चळवळीतील नेते **एस. आर. गायकवाड,** ज्येष्ठ आंबेडकर चळवळीतील नेते **इरप्पाअण्णा इंगळे,** तसेच ज्येष्ठ आंबेडकर चळवळीतील नेते, सोलापूर महानगरपालिकेचे माजी महापौर, व कामगार नेते **बुध्दवासी मुरलीधर पात्रे** यांची बुधवार पेठ परिसरामध्ये व न्यू बुधवार पेठ बागले वस्ती येथे असलेल्या विविध रस्त्यास नामकरण करणेस, तसेच सम्राट चौक ते बाळीवेसकडे जाणा-या मार्गास चेंबर ऑफ कामर्सचे माजी चेअरमन, निलकंठ बॅन्केचे माजी चेअरमन, प्रसिध्द उद्योगपती **कै. विश्वनाथजी करवा** यांचे नामकरण करणेस, नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २६५ ठ. क्र. २६२
दि. २०।१२।१६ ..... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



बाळे येथील खंडोबा देवस्थान यात्रेकरीता महापालिकेकडून मिळणारे अनुदान हे अत्यंत कमी प्रमाणात असून ते वाढवून देणेत यावे कारण हे देवस्थान शहरातील हद्दवाढ भागात असून या ठिकाणी येणाऱ्या भाविकांना देवदर्शनाकरीता ज्या मुलभुत सोयी उपलब्ध करुन दयाव्या लागतात. त्याकरीता त्या करीता उपलब्ध होणारे अनुदान कमी पडते. परिणामी भाविकाची मोठया प्रमाणात गैरसोय होते तसेच श्री.खंडोबा देवस्थान श्रीक्षेत्र बाळे येथील देवस्थान लगतची जागा सर्व्हे नं.१४(६५.१चौ.मी.) ग्रामपंचायत बाळे १९८८ रोजी नोंद झालेली देवस्थान भक्त निवास व वाहन तळासाठी मिळावी कारण अलीकडील काळात भक्ताची गर्दी व आजुबाजुच्या जागेच्या अडचणीमुळे श्री च्या दर्शनाकरीता येणाऱ्या भाविकांना आपले वाहन लावण्यास गैरसोय होत आहे. परगावहुन येणाऱ्या भाविकांसाठी शौचालय, स्नानगृह व वाहन तळ अशा प्रकारच्या सोयी करणेकरीता भक्त निवासाकरीता जागेची अत्यंत आवश्यकता असल्याने मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याकामी प्लॅन व एस्टीमेट तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २६६ ठ. क्र. २६३
दि. १०/१२/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



बाळे, केगांव, हद्दवाढ भागातील नगरामध्ये ड्रेनेज लाईन टाकणे रस्ते करणे, दिवाबत्तीची सोय करणे आदी कामे करणे अत्यावाश्यक आहे. कारण बाळे, केगांव, हद्दवाढ भागामध्ये मोठया प्रमाणावर नागरी वस्त्या, शैक्षणिक संकुल, निवासी संकुल इ.ची मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यापैकी बाळे केगांव वसंत विहार, गणेश नगर, लक्ष्मी नगर, शिवाजी नगर, देशमुख-पाटील वस्ती, डुमणे नगर, संतोष नगर, जयमल्हार नगर आदी नगरात पिण्याच्या पाण्याच्या पीव्हीसी लाईन टाकण्यात आले आहेत. त्याऐवजी या परिसरात शासनाच्या योजनेतून किंवा महापालिकेच्या उपलब्ध निधीमधून पिण्याच्या पाण्याची डी.आय.पाईप लाईन टाकणेत यावी. सोलापूर शहराची स्मार्ट सिटीकडे वाटचाल होत असताना सदर भागाचा विकास होणे अत्यावश्यक असल्यामुळे मान्यता देणेत येत आहे.

सदरकामी सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ.243 ठ. क्र. 248
दि. 30/12/2016 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील अक्कलकोट रोड सार्वजनिक स्मशानभूमी सुधारणा समिती, सोलापूर ही संस्था नुकतीच स्थापन झालेली आहे. ही संस्था अक्कलकोट रोड, हिंदु सार्वजनिक स्मशानभुमी,रविवार पेठ येथील हिंदु स्मशानभुमी परिसरातील मनपा मार्फत मा.आयुक्त गुडेवारसाहेब यांनी सुधारणा केलेली जागा १८ समाजाचे अध्यक्ष ही संस्था चालवित आहे.

वरील संस्था ही सर्व समाजातील मृतांचे अंतिम संस्कार या ठिकाणी केले जात आहे. नुकतेच येथे मनपा मार्फत सुधारणा करण्यात आले आहे या वास्तुचे सुरक्षा/काळजी घेणे ही बाब नितांत आवश्यक आहे. मनपाकडे पर्याप्त मनुष्यबळ नसल्याने या ठिकाणी संस्थेमार्फत विनामुल्य सेवा उपलब्ध करुन देणे/ मुत्यु नोंदी घेणे/ अस्थीकलश ठेवणे, परिसर स्वच्छता ठेवणे इ.कामे सदर संस्था करण्यास तयार आहे तरी ही जागा महानगरपालिकेच्या मालकी ताब्यातील असल्याने प्रचलित नियमानुसार नाममात्र भाडे आकारुन ९९ वर्षे मुदतीच्या भाडे कराराने देणेस, मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रामुली/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 240 ठ. क्र. 265
दि. 30.12.21.96 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



श्री रत्नाकर निजप्पा बनसोडे राहणार, गरिबी हटाव झो.नं १ विजापूर नाका सोलापूर यांना कॅन्सरचा आजार झालेला आहे. त्यांच्या घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असून कॅन्सरवरील उपचारासाठी येणारा खर्च ते करु शकत नाहीत. तरी श्री रत्नाकर निजप्पा बनसोडे राहणार, गरिबी हटाव झो.नं १ विजापूर नाका सोलापूर यांना कॅन्सरवरील उपचारासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीजास्त वैद्यकीय मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/खास/नियमित
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २६९ ठ. क्र. २६६
दि. १०/१२/२०१८ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्रमांक २० मधील अक्कलकोट रोड अविनाश नगर लगतची असलेली म्हेत्रेवस्ती येथील सर्व्हे नंबर २८३/२ याठिकाणी सध्या स्वामी विवेकानंद प्राथमिक शाळा सुरु असून, सदर शाळेच्या बाजूला खुली जागा आहे. सदरचे जागा मालक ही जागा म.न.पा.स विनामोबदला देणेस तयार आहेत तरी या खुल्या जागेत सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने दवाखाना व प्रसुतीगृह बांधल्यास हया भागातील गोरगरिब, कष्टकरी, कामगार महिला यांना सदर दवाखान्यामुळे सोय होणार आहे.

तरी सर्व्हे नंबर २८३/२ याठिकाणी असलेल्या खुल्या जागेत महानगरपालिकेच्या वतीने दवाखाना व प्रसुतीगृह बांधणेकामी सन २०१८-१७ चे अंदाजपत्रकीय म.न.पा. दवाखाने बांधणे व अद्ययावत करणे या बजेट हेडमधून रक्कम उपलब्ध करुन कामाचे प्लॅन व एस्टीमेट तयार करणेस, येणारे खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

सदरची जागा म.न.पा.स विनामोबदला घेणेत यावी व याकामी प्लॅन व एस्टीमेट तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २६७ ठ. क्र. २६७ दि. १०/१२/२०१६ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

२६७

सोलापूर महानगरपालिकेच्या मलेरिया विभागाकडे सध्या कंत्राटी पध्दतीने घेण्यांत आलेल्या सेवकांना ठराविक मानधन आदा करण्यांत येत असून,यामुळे सध्या महागाईच्या दिवसामध्ये सदर त्यांना देण्यांत येत असलेल्या मानधनाच्या रक्कमेतून त्यांचा उदरनिर्वाह होणे अत्यंत कठीण होत आहे.तरी सदरहू मलेरिया विभागाकडील कंत्राटी मानधनावर घेण्यांत आलेल्या सेवकांना मानधनाऐवजी सोलापूर महानगरपालिकेकडील रोजंदारी दरानुसार वेतन आदा करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच याशिवाय अन्य आस्थापनेवर असे जे लोक असतील त्यांना सुध्दा याच नियमानुसार प्रस्तावात नमूद प्रमाणे कार्यवाही ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका